Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचारः एक भौगोलिक अभ्यास

**प्रा. डॉ.कांबळे डी.एस.**
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर ता. तुळजापूर जि. धाराशीव,महाराष्ट्र
**Email:** Kambleds19@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171222
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 107-110
December 2025

**Submitted:** 17 Nov. 2025
**Revised:** 27 Nov. 2025
**Accepted:** 12 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***सारांश***

*महात्मा जोतीराव फुले हे हाडाचे आदर्श शेतकरी व महापुरुष होते. मानव हा सर्व सजीवामध्ये सर्वात बुद्धीमान प्राणी आहे.पृथ्वीवरील मानव जन्मताच सर्व समान असून त्यांच्यामध्ये निसर्गाने कोणताही भेदभाव केलेला नाही. भेदभावाचीची कृत्रिम कल्पना मानवानेच स्वतःच्या स्वार्थासाठी निर्माण केलेली आहे. समाजातील काही उच्चवर्णिय लोकांनी समाजातील शूद्र, कष्टकरी व शेतकरी यांना तुच्छ समजून त्यांच्या सोबत बेटी व्यवहार, मंदिरातील मूर्तीस स्पर्श करू न देणे, जेवणाच्या पंगतीपासून दूर बसवणे, शेतक ऱ्यांच्या मुलाबाळांना शिक्षणापासून वंचित ठेवणे, असे अनेक प्रकारे त्यांच्यावर जुलूम, अत्याचार व अन्याय केला जात असे, अशा प्रकारे समाजात होणा ऱ्या अन्याय व अत्याचारला त्यांनी कडाडून विरोध केला. शेतकरी व कष्टकरी मुलांच्या शिक्षणाची सोय करून दिली व त्यांना शहाणे केले. भारत हा कृषिप्रधान देश आहे. बहुतांश शेतक ऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हे कृषी आहे. भारतातील जास्तीत जास्त लोक हे शेतीशी निगडित व्यवहारात गुंतलेले आहेत, म्हणून महात्मा जोतीराव फुले यांनी शेतक ऱ्यांना अज्ञान व अंधश्रद्धा यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. महात्मा जोतीराव फुले यांनी शेतक ऱ्यांना आपल्या शेतात खरीप व रब्बी पिके, बागायती शेती आणि भाजीपाल्याची शेती करण्यासाठी त्यांनी जागृत केले. महात्मा जोतीराव फुले यांनी शेती व शेतकरी विषयक केलेले कार्य हे आजच्या काळात अतिशय महत्त्वाचे ठरते.*

***मुख्य शब्द:*** *शेती व शेतकरी*

## परिचय

विद्येविना मति गेली;
मतीविना नीति गेली;
नीतीविना गति गेली!
गतीविना वित्त गेले;
वित्ताविना शूद्र खचले;
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

अविद्येमुळे माणसाच्या आयुष्यात किती अनर्थ घडतो याचे सूत्र मांडणारे महात्मा फुले आधुनिक महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ कृतिशील विचारवंत होते. ते समाज परिवर्तनाच्या चळवळीचे खंदे प्रवर्तक होते. दिनांक 11 एप्रिल 1827 मध्ये त्यांचा जन्म पुण्यात झाला. फुलेंचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण. उपजीविकेसाठी कटगुणचे 'गोरे' पुण्याच्या मीठगंज पेठेत आले. फुलांशी निगडित व्यवसाय असल्याने ते फुले नावाने ओळखले जाऊ लागले. जोतिबा नऊ महिन्यांचे असतानाच त्यांच्या मातोश्री चिमणाबाई देवाघरी गेल्या. सगुणाबाई क्षीरसागर या गोविंदरावांच्या मानलेल्या बहिणीने जोतिबांचे संगोपन केले. या माऊलीच्या परीसस्पर्शानेच जोतिबांच्या जगण्याला सोनेरी रूप प्राप्त झाले.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ.कांबळे डी.एस., जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर ता. तुळजापूर जि. धाराशीव, महाराष्ट्र*

**How to cite this article:**
*डी.एस., . कांबळे . (2025). महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचारः एक भौगोलिक अभ्यास. Journal of Research and Development, 17(12(A)), 107–110. https://doi.org/10.5281/zenodo.18184640*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18184640
OPEN ACCESS

ज्ञानापासून वंचित असलेल्या समाजाच्या अगतिकतेचे मूळ जोतिबांनी ओळखले होते. अज्ञानमूलक आंधळया धर्मश्रद्धेमुळे उदासीन व निष्क्रीय राहिलेल्या समाजमनात चैतन्य निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रथम शिक्षणाचे द्वार ठोठावले. शिक्षणाच्या द्वारातूनच सुधारणेचे वारे वाहू शकते आणि माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेचे जिणे लाभू शकते, हा विश्वास बहुजनांच्या मनात निर्माण करणे एवढे सोपे नव्हते. पिढ्यान् पिढ्या सामाजिक, बौद्धिक गुलामगिरीत पगडा दूर करण्यासाठी जोतिबांनी 1848 मध्ये मुलीची शाळा सुरू केली. समाजाची खरी उन्नती साधावयाची असेल, तर पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाला अग्रक्रम दिला पाहिजे, हे जाणणारा एक द्रष्टा पुरुष जोतिबांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभला म्हणून तर आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक ज्ञानज्योती फुलू शकल्या.

महात्मा फुले हे भारतीय आधुनिक इतिहासातील आद्य समाज क्रांतिकारक होते. आपले विचार प्रत्यक्षात आचरणात आणणारे एक थोर समाज सुधारक होते. महात्मा फुले यांच्या विचारावर **'थॉमस पेन'** यांनी लिहिलेल्या मानवधिकार (राईट ऑफ मॅन) या ग्रंथाचा खूप प्रभाव होता. त्यांनी समाजातील असणारी समाज विध्वंसक परंपरा व चालीरीतीला कडाडून विरोध केला. जातीप्रथा उच्चवर्णीय लोकांचे वर्चस्व, महिलावरील अत्याचार, सांस्कृतीक गुलामगिरी, गरिबावर होणारा अन्याय, अत्याचार व शेतकरी कष्टकऱ्यांची होणारी पिळवणूक रोखण्यासाठी आही जातीयवादी लोकांविरुद्ध संघर्ष केला. त्यांचा हा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता. त्यांनी 1873 साली **'सत्यशोधक समाजाची'** स्थापना केली. अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. महात्मा जोतीराव फुले एक दृष्टे विचारक होते. आज भारतात शिक्षण, स्त्रीशिक्षण त्याचबरोबर शेती संबंधी चे विचार हे महत्त्वाचे आहेत. शेतीमध्ये काबाडकष्ट करणारा शेतकरी हा अनेक अडचणीला सामोरे जात आहे, निसर्गाचा लहरीपणा, पाणी पुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी यामुळे शेतकरी हैराण आहे, शेतामध्ये उत्पादित झालेल्या अन्नधान्यला बाजारात योग्य भाव मिळत नाही, म्हणून अशा अडचणीमुळे शेतकरी आपल्या जीवनाला कंटाळून आत्महत्या करतो. त्यामुळे आज शेतकरी आत्महत्या हा चिंतनाचा विषय असला तरी सव्वाशे वर्षांपूर्वी **'शेतकऱ्याचा असूड'** 1883 या ग्रंथात शेती व शेतकऱ्याच्या दूरावस्थेची व्यथा महात्मा जोतीराव फुले यांनी अतिशय निर्भीड व खंबीरपणे मांडलेली होती. शेती हा भारतातील लोकांचा प्रमुख प्राथमिक श्रेणीचा व्यवसाय आहे. त्यामुळे देशातील शेती व शेतकरी जगला पाहिजे यासाठी त्यांनी उपाययोजना ही सांगितले आहेत. महात्मा जोतीराव फुले यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी मांडलेले विचार आज आपण जलयुक्त शिवार, बांधबंधारे, ओढे-नाले सरळीकरण, नदी, तळी आणि धरण या मधील गाळ काढणे, यासारख्या उपयुक्त योजना अंमलात आणल्या शेतीक्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल करता येऊ शकतो. अशाप्रकारे महात्मा जोतीराव फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार हे अतिशय दूरदृष्टीचे होते.

कृष् म्हणजे **'नांगरणे'** या धातूपासून 'कृषी' हा शब्द बनला आहे. जमीन नांगरून तिच्यात बी पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्यांच्या रोपांची काळजी वाहून त्यांच्यापासून धान्य मिळवणे म्हणजे शेती होय.

शेती हा मानवाचा प्राथमिक श्रेणीचा व्यवसाय आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील जवळपास 70% लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत तर 65% लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. राष्ट्रीय उत्पादनात कृषीचा फार मोठा वाट आहे.

**उद्देश**

1) महात्मा जोतीराव फुले यांनी शेती व शेतकरी विषयक केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
2) शेती सुधारण्यासाठी केलेल्या उपाययोजना अभ्यासणे.

**संशोधन पध्दती**

सदरील शोधनिबंध हा महात्मा जोतीराव फुले यांच्या शेती व शेतकरी विषयक अतिशय महत्वपूर्ण योगदाना विषयी माहिती लिहिण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये शोधनिबंधाच्या अनुषंगाने विविध संदर्भग्रंथ, जर्नल, मासिके, दैनिक वृतपत्रे, प्रकाशित अहवाल यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन**

महात्मा ज्योतिराव फुले हे हाडाचे आदर्श शेतकरी होते त्यांना शेती व शेतकरी यांचा फार अभिमान वाटत असे. शेतकरी खऱ्या अर्थाने देशाचा पोशिंदा आहे, हे त्यांचे परखड मत होते. त्यांचा जन्म शेतकरी माळी कुटुंबात झाला. त्यामुळे शेती व शेतकरी याविषयी असलेली त्यांची तळमळ कमालीची होती. महात्मा फुले यांनी देशातील शेतकऱ्यांची खरी कैफियत मांडली, शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडणारे पहिले भारतीय म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव घेतले जाते. ब्रिटिश राजवटीच्या काळात शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती होती. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांवर होणारे अन्याय व अत्याचाराविरुद्ध खंबीरपणे लेखणीच्या स्वरूपातून वेळोवेळी मांडली केली. या देशातील शेतकरी हा प्रमुख राजा आहे. तो वर्षभर नव्हे तर आयुष्यभर आपल्या शेतात काबाडकष्ट करतो व संपूर्ण देशासाठी अन्नधान्याचा पुरवठा करतो. मात्र कष्टकरी शेतकऱ्यांची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती ही दुर्दैवाने सदैव

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

हलाखीचे असायची, याकडे कोणाचेही लक्ष जात नाही, हे फार शोकांतिका आहे. त्यासाठी महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाचे कार्य केले.

महात्मा फुलेनी सांप्रत शेतकऱ्याचे तीन प्रकार केले आहेत त्यामध्ये शुद्ध शेतकरी म्हणजे निव्वळ शेतीवर आधारित आपले आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणारे कुणबी, शेतीचे काम सांभाळून बागायती शेती करू लागलेले माळी, जे दोन्ही कार्य करून शेळया, मेंढ्या पाळू लागले ते धनगर असे तीन प्रकार केले. हे शूद्र मूळचे शेतकरीच असावेत असे यांचे म्हणणे होते. जगातील इतिहासाचा अभ्यास करताना महात्मा ज्योतिराव फुले यांना असे आढळून आले आहे की, आपल्या देशातील शेतकरी हा अज्ञानी आणि देवावर विश्वास ठेवून आपले कार्य करत असतो, यामुळे यांचा विकास होत नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांना या अज्ञान व अंधश्रद्धेच्या अंधकारातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण अर्थव्यवस्थेची रचना महात्मा फुले यांनी मांडली आहे, त्यासंबंधी ते म्हणतात. ज्या शेतकऱ्याजवळ थोडी शेती होती तो शेतकरी शेतीला जोड व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसाय करत असे व गावाभोवतालच्या डोंगरावरील दऱ्याखोऱ्यातून व जंगलातून जांभूळ, करवंद, उंबर इ. फळे खाऊन आपला उदरनिर्वाह भागवत असे. परंतु इंग्रज सरकारने कारस्थानी कामगारांच्या सल्ल्याने जंगल खाते तयार करून सर्व पर्वत, दऱ्याखोरे, पडीक जमिनी, माळरान, जंगले व गायराने इ. आपल्या ताब्यात घेतल्याने कष्टकरी शेतकऱ्यांचे गायी, म्हशी त्यांचे वासरे, शेळया-मेंढ्या यांना लागणारा चारा हा नाहीसा झाला. शेतीवर अवलंबून असणाऱ्या साळी, कोष्टी, धनगर, लोहार, सुतार इ. कुणबी लोकांच्या व्यवसायावर देखील संकट आले. कारण इंग्लंडमधील कारागीर लोकांनी येथील निर्माण होणाऱ्या सर्व वस्तू तेथे यंत्राद्वारे निर्माण करून येथे आणून स्वस्तात विकू लागल्याने येथील देशी मालास मंदी आली व ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. येथील कोष्टी, साळी, जुलची, मोमीन कंगाल झाले व ते उपाशीपोटी मरू लागले. या सर्वांमुळे देशातील अर्थव्यवस्था व समाज व्यवस्था विस्कळीत झाली.

**शेती सुधारणा विषयक उपाययोजना:**

महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म मुळातच शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे त्यांना शेती व शेतकऱ्या विषयी आत्मीयता होती. त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सुधारला पाहिजे त्यासाठी त्यांनी इ.स. 1878 मध्ये खेड्यापाड्यात जाऊन शेतकऱ्यांना शेती विषयक योग्य मार्गदर्शन केले. तसेच शेती समस्यांचा अभ्यास करून अत्यंत व्यवहारी व शास्त्रीय उपयोजना मांडल्या आहेत.

1) शेतकरी हा अंधश्रद्धेत गुरफटलेला असल्याने तो अन्याय व अत्याचार यात होरपळून जात आहे. शेतकरी अक्षर शून्य व अज्ञानी असल्याने व ब्राह्मण जातिभेद करीत असत्याने त्यांचा फायदा होतोच. यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना सक्तीच्या शिक्षण या संदर्भामध्ये सरकारने कायदा करावा. तेंव्हाच शेतकऱ्यांची मुले शाळा शिकतील व देशातील शेतकरी सुधारेल.

2) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. शेतीचा कस कायम राहण्यासाठी शेतकऱ्याजवळ गाय, बैल, म्हैस, वासरे, शेळया व मेंढ्या राहणे गरजेचे आहे. कारण त्यांच्यामुळे शेण खताचा पुरवठा शेतीस होईल व शेतीचा कस पीक वाढीसाठी चांगला राहील. त्यामुळे भरपूर अश्रधान्याचे उत्पादन झाल्यास याचा आर्थिक फायदा होईल.

3) देशातील शेती ही नैसर्गिक पावसावर अवलंबून असल्यामुळे, सर्वत्र पाऊस समान स्वरुपात पडत नाही. काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी कमी पाऊस पडतोत्यामुळे शेतकरी सदैव चिंतेत असतो हे टाळण्यासाठी महात्मा जोतीबा फुले यांनी जमिनीतील पाण्याची पातळी वर राहण्यासाठी तसेच ओढे नाल्यांना, विहिरींना पाणी कायम राहण्यासाठी, पावसाच्या पाण्याने जमिनीची धूप होऊन जमिनीचा कस वाहून जाऊ नये म्हणून या देशात सर्वप्रथम "पाणी आडवा, पाणी जिरवा व पाण्याचा उपयोग बचतीने करा" असे विचार महात्मा जोतीबा फुले यांनी मांडले.

4) पर्वतावरील व डोंगर उतारावरील झाडे, पाने, फुले, गवत व किटक इ. वाहून जाऊ नये म्हणून जागोजागी तालीवजा बंधारे बांधावेत, त्यामुळे पावसाचे पाणी शेतात मुरते, जमिनीची धूप होणार नाही व जमिनीचा कस कायम राहून जमीन सुपीक बनते. तसेच डोंगर टेकड्या मधील दऱ्याखोऱ्यानी तलाव व तळी, पाझर तलाव बांधावे. तसेच ओढ्या नाल्यांना उन्हाळयात पाणी असल्याने लहान-मोठे वसंत बंधारे घालून जागोजागी पाणी आडवावे त्यामुळे तेथील परिसरातील विहिरींना पाणी पुरवठा होऊन त्यापासून सर्व शिवार बागायती होऊन शेतकरी सुखी होईल आणि सरकारचाही फायदा होईल.

5) शेतकरी आपल्या शेतात विहीर खोदत असेल तर सरकारने त्यांना प्रोत्साहनात्मक मदत करावी नदी, नाले, ओडे, तळी व पाझर तलाव यामधील साचलेला गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य नेण्यास परवानगी द्यावी. गायरान जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात द्यावे, तसेच चांगल्या प्रतिची संकरित जनावरे शेळया मेंढयांची पैदास देशात करावी. त्यामुळे त्यांच्या मलमूत्रापासून खत मिळेल व शेती सुपीक होण्यास मदत होईल. मेंढयांच्या लोकरीपासून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल.

6) शेतकरी शेतामध्ये वर्षभर मेहनत करून पिकाची जोपासना करतो मात्र त्या पिकांची रानटी प्राणी नासधूस करतात. रानटी जनावरापासून संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांच्याच हाती गावठी बंदुकीचा परवाना देण्यात यावा ते शक्य नसल्यास त्याच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

पिकांचे संरक्षण पोलीस खात्याने करावी. याही परिस्थितीत पिकांचे नुकसान झाल्यास सरकारने त्याची भरपाई करून द्यावी अशा प्रकारचा कायदा सरकारने करावा.

7) शेतकऱ्यासाठी दरवर्षी श्रावण महिन्यात प्रदर्शने भरवून आश्विन महिन्यात शेती पिकांच्या व औत हाकण्याच्या परीक्षा घेऊन शेतकऱ्यास बक्षिसे द्यावी आणि त्यांना पदव्या द्याव्यात. असे केल्यास शेतकऱ्यांचा आत्मसन्मान वाढतो व शेतकरी सुखी समाधानी जीवन जगू शकतो.

**निष्कर्ष**

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाल्याने, त्यांना शेतक-यांच्या परिस्थितीची जाणीव होती. प्रामुख्याने शेती हा आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचा शेती व शेतकरी हा केंद्रबिंदू आहे. मात्र दुर्दैवाने शेतकरी हाच उपेक्षित राहिला त्यासाठी देशाची शेती व शेतकरी जोपर्यंत सुखी होणार नाही. तोपर्यंत देश सुखी होणार नाही हे महात्मा फुले यांनी ओळखले होते. त्यासाठी समाजातील उच्चवर्णीय ब्राह्मणानी, सरकारी खात्यातील नोकरवर्ग शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक लूट करायची त्यासाठी शेतकऱ्यांना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी त्यांच्या मुलांबाळांसाठी शाळा काढून त्यांना शहाणे केले. शेतामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, नगदी पिके, बागायती शेती व भाजीपाल्याची शेती केल्यास शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारेल. आपली शेती निसर्गावर अवलंबून असल्याने निसर्गाचा लहरीपणा शेतीसाठी घातक असतो, म्हणून दुष्काळाच्या काळात शेतीसाठी पाणी कालवे, तळी तलाव व विहीरीच्या माध्यमातून दिले पाहिजे. शेतीच्या सुपीकतेसाठी व संरक्षणासाठी ही उपाय योजना मांडल्या. महात्मा फुले यांनी त्यावेळेस मांडलेले शेती व शेतकरी विषयक विचार अत्यंत उपयुक्त व महत्त्वाचे ठरत आहेत.

अचाट जिद्दीच्या व दिव्यदृष्टीच्या या महात्म्याची ही कृती अचंबित करणारी आहे. दलित, कष्टकऱ्यांचे कैवारी असणाऱ्या फुलेंना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुरुस्थानी मानले. आपल्या मृत्यूनंतरही प्रेरणा देतात, तेच महात्मे असतात. म. फुलेंचे मोठेपण त्यांच्या शुद्ध आचार विचारात होते.

मानवतेच्या प्रतिष्ठेसाठी, व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी आणि सामाजिक गुलामगिरीच्या उच्चाटनासाठी अहोरात्र तळपणारा हा क्रांतिसूर्य 28 नोव्हेंबर 1890 या दिवशी मावळला. आज हाच सूर्य शेतकऱ्यांसाठी चैतन्याचे बळ देतो आहे. या क्रांतिसूर्याला वंदन करण्यासाठी महर्षी शिंदे यांच्या लेखणीतून शब्द झिरपले -

'सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ।
पतितांचा पालनवाला । हा धन्य महात्मा झाला ।

**संदर्भ**

1. कीर, धनंजय (1968) महात्मा ज्योतिराव फुले. मुंबई
2. यशवंत पाटणे (2013) चैतन्याचे चांदणे- संस्कृती प्रकाशन, पुणे.
3. डॉ. दिलीप गरुड (2015) कथा जोतीबा – सावित्रीची श्रीगणेश प्रकाशन, पुणे.
4. ए. बी .सवदी ,पी .एस. कोळेकर (2007) मानवी व प्रायोगिक भूगोल – निराली पब्लिशर्स, पुणे.
5. बा.ग. पवार युगपुरुष - महात्मा ज्योतिराव फुले.
6. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले जोतिपर्व.
7. संपा. य.दि. (1991) फडके महात्मा फुले समग्र वाङ्:मय – म रा साहित्यआणि संस्कृती मंडळ,मुंबई.